प्रेसनोट　　　　　　　　　　दिनांक ०३/०१/२०२५

**ठाणे - ग्रुप ग्रामपंचायत, शहापूर येथील ग्रामपंचायत अधिकारी यांना लाच स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे यांनी रंगेहात पकडले बाबत.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | :- | ठाणे |
| तक्रारदार | :- | पुरुष, वय-४२ वर्षे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | सुरेश गणेश राठोड, वय ४१ वर्षे, पद- ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत वरस्कोळ, राहणार- सुंदर नारायण अपार्टमेन्ट, बी-विंग, रुम नं. १७, पंडितनाका, शहापूर, जि. ठाणे. |
| मागितलेली लाचेची रक्कम | :- | ५०००/- रूपये |
| स्विकारली लाचेची रक्कम | :- | तडजोडीअंती ३०००/- |
| थोडक्यात हकीकत | :- | यातील लोकसेवक यांनी, तक्रारदार यांचे प्रलंबित कामासंदर्भातील पत्र देण्याकरीता यातील तक्रारदार यांचेकडे स्वत:करीता ५०००/— रु. लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याने यातील तक्रारदार यांनी लोकसेवक यांचेविरूध्द कारवाई करण्याकरिता अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दि. ०१/०१/२०२५ रोजी लेखी तक्रार दिलेली आहे.<br>नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दि.०२/०१/२०२५ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये यातील लोकसेवक यांनी तक्रारदार यांचे प्रलंबित कामाचे अनुषंगाने पत्र देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे ५०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ३०००/- रु लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.<br>त्याअनुषंगाने दि. ०३/०१/२०२५ रोजी आजमविण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचकडून ३०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडण्यात आलेले असून, गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी - १. मा. श्री. शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**२. मा. श्री. संजय गोविलकर, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**
**३. मा. श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि,भ्रष्टाचार संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता - लाप्रवि ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४००६०१
संकेत स्थळ- acbmaharastra@mahapolice.gov.in
Email – spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन - acbmaharastra.net
टोल फ्रि नंबर- १०६४
दुरध्वनी कमांक - ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्अॅप् कमांक - ९९३०९९७७००

पोलीस निरीक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे

(राजश्री शिंदे)
पोलीस निरीक्षक,
अन्टी करप्शन ब्युरो, ठाणे